शिक्षणाचा अधिकार
सर्व शिक्षा अभियान
सारे शिकूया, पुढे जाऊया

# महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई

## <u>निवासी शाळा</u>

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, 2009 अन्वये प्रत्येक बालकाला नजीकच्या नियमित शाळेत दाखल करुन मोफत व सक्तीचे शिक्षण मिळणे हा बालकाचा मूलभूत अधिकार आणि शासनाचे कर्तव्य आहे. तथापि विखुरलेल्या वस्त्यामधील, डोंगराळ व अति दुर्गम भागातील मुले, शहरी वंचित, बेघर, अनाथ, रस्त्यावर राहणारी आणि सतत स्थलांतर करणाऱ्या मुलांच्या शिक्षणाची सोय नजीकच्या शाळेत करणे शक्य होत नाही. अशा मुलांच्या शिक्षणाची सोय करण्यासाठी केंद्र शासनाने निवासी शाळा हा महत्वांकाक्षी कार्यक्रम सुरु केला आहे. या शाळेतील मुलांना कस्तुरबा गांधी बालिका विदयालयाच्या धर्तीवर निवास, भोजन, सुरक्षा, शालेय भौतिक सुविधा आणि अध्ययन-अध्यापनाच्या सुविधा उपलब्ध केल्या जाणार आहेत.

राज्यातील पुणे जिल्हयात-1, कोल्हापूर जिल्हयात-1 व नंदुरबार जिल्हयात-3 अशा एकूण 5 निवासी शाळा सुरु करावयाच्या आहेत. या शाळा चालविण्यासाठी नोंदणीकृत खाजगी शैक्षणिक संस्थाकडून खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून अर्ज मागविण्यात येत आहे.

1) इच्छूक संस्थानी शाळा सुरु करण्यासाठीचा अर्ज संबंधित जिल्हयाच्या शिक्षणाधिकाऱ्याकडे (परिशिष्ट -1) मध्ये दिनांक 27/01/2012 रोजी दुपारी 3.00 वाजेपर्यंत निर्देशीत पेटी मध्ये टाकावा. इतर मार्गाने आलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

2) मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली अर्जदाराच्या/प्रतिनिधींच्या उपस्थितीत प्राप्त अर्ज व कागदपत्राची छाननी दिनांक 27/01/2012 रोजी दुपारी 4.00 वाजता करण्यात येईल.

3) छाननी केलेल्या पात्र अर्जाची लघुसूची तयार करुन त्याच दिवशी अधिकृत कार्यालयीन सूचना फलकावर लावण्यात येईल. ही लघुसूची-1 सात दिवसापर्यंत सूचना व हरकती घेण्याकरीता सूचना फलकावर प्रसिध्द करण्यात येईल.

4) जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक), प्राप्त झालेल्या सूचना व हरकती संबंधित संस्थाना अर्जात नमूद केलेल्या ई-मेल पत्त्यावर पाठवतील.

5) विहित मुदतीत प्राप्त झालेल्या सूचना व हरकतीवर संबंधित जिल्हयाचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुनावणी घेऊन निर्णय घेतील. व दिनांक 03/02/2012 पर्यंत लघुसूची-1 अंतिम

करतील. ही लघुसूची -1 कार्यालयीन फलकावर प्रसिध्द करण्यात येईल तसेच शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद संबंधित संस्थाच्या ई-मेल पत्त्यावर पाठवतील.

6) लघुसूची-1 मध्ये समाविष्ट संस्थाची संबंधित जिल्हयाचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक), क्षेत्रीय पहाणी करतील आणि पात्र संस्थाची यादी तयार करतील ही यादी जिल्हा परिषदेच्या अधिकृत सूचना फलकावर सात दिवसाकरीता सूचना व हरकती मागविण्याकरीता प्रसिध्द करण्यात येईल. तसेच या सूचना व हरकती संबंधित जिल्हयाचे शिक्षणाधिकारी संस्थाना ई-मेल पत्त्यावर पाठवतील.

7) विहित मुदतीत प्राप्त झालेल्या हरकती व सूचनावर मुख्य कार्यकारी हे सुनावणी करुन निर्णय घेतील.

8) जिल्ह्यामध्ये कार्यरत संस्थांना निवासी शाळा सुरू करण्यासाठी खालील बाबी विचारात घेऊन प्राधान्य देण्यात येईल.

   a. निवासी शाळा चालविण्याचा किमान 3 वर्षाचा अनुभव.
   b. निवासी शाळेतील विद्यार्थी संख्या.
   c. शासकीय शिष्यवृत्ती परीक्षा उत्तीर्ण व शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थी संख्या.
   d. संस्थेला आर्थिक मदत करणाऱ्या इतर संघटना जसे- युनिसेफ, जागतिक बँक, उद्योग क्षेत्रे, अशासकीय संघटना, इत्यादी.

9) निवड झालेल्या व निवड न झालेल्या संस्थाची लघुसूची - 2 करण्यात येईल. ही लघुसूची संबंधित जिल्हयाचे शिक्षणाधिकारी संस्थाच्या ई-मेल पत्त्यावर पाठवतील.

10) मुख्य कार्यकारी अधिकारी हे शिफारस झालेल्या संस्थाची यादी आपल्या स्वाक्षरीनिशी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांच्याकडे पाठवतील.

11) महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद प्राप्त झालेल्या प्रस्तावाचे पुनर्विलोकन करुन शासनाकडे अंतिम मंजूरीसाठी पाठविण्यात येईल.

12) शासनाची मंजूरी प्राप्त झाल्यानंतर निवडलेल्या संस्थांना निवासी शाळा सुरु करण्याबाबतची कार्यवाही **शिक्षण संचालक (प्राथमिक)** करतील.

13) एकही संस्था पात्र न ठरल्यास या शाळा शासनामार्फत तात्काळ सुरू करण्यात येतील.

14) निवड करण्यात आलेल्या संस्थाना RTE Act-2009 मधील निकष व मानके तसेच अटी व शर्तीची पूर्तता करण्याकरीता स्वारस्य अभिव्यक्ती देतील.

15) RTE Act-2009 मधील निकष व मानके तसेच अटी व शर्तीची पूर्तता करणाऱ्या संस्थासोबत केंद्र शासनाच्या निकषप्रमाणे करार करण्यात येईल.

16) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना शाळा सुरु झाल्याच्या दिनांकापासून आठ दिवसाच्या आत संबंधित संस्थेने शाळा सुरु झाल्याचा अहवाल सादर करावा.

17) निवासी शाळा सुरू नसल्यास कराराच्या दिनांकापासून 1 महिन्याच्या आत शाळा सुरु करणे संबंधित संस्थेवर बंधनकारक राहील.

18) विहित मुदतीत शाळा सुरु न केल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता करार आपोआप संपुष्टात येईल व शाळेची परवानगी आपोआप रद्द होईल.

19) पात्र संस्थांनी सुरु केलेली निवासी शाळा अनुदानास पात्र राहील (प्रत्येक निवासी शाळेसाठी प्रतीवर्षी आवर्ती अनुदान रू. 32.00 लाख तसेच निकषाप्रमाणे अनावर्ती अनुदान अनुज्ञेय राहील).

20) शाळा सुरू करण्यास परवानगी दिल्यानंतर RTE Act-2009 व Rule 2010 मधील तरतुदीचे पालन करणे शाळा व संस्थेवर बंधनकारक राहील.

21) शाळेच्या व्यवस्थापनामध्ये गंभीर स्वरुपाच्या त्रुटी आढळून आल्यास त्या त्रुटी तीन महिन्याच्या पूर्ण करण्याची संस्थेस संधी देण्यात येईल. विहित मुदतीत त्रुटी दूर न केल्यास शाळा बंद करुन शाळा चालविण्याचा अधिकार शासन स्वतः कडे घेईल.

22) शाळा बंद झाल्यानंतर संस्थेचे काही आर्थिक दायित्व असल्यास त्याची परत फेड करण्याची तसेच न्यायालयीन प्रकरण उद्‌भवल्यास याबाबतची संपूर्ण जबाबदारी संस्थेची राहील.

23) संस्थेने देय दायित्व पूर्ण न केल्यास हे दायित्व संस्थेच्या सुरक्षा ठेव / बँक हमी रक्कमेतून पूर्ण करण्यात येईल.

24) केंद्र शासनाने/राज्य शासनाने/स्थानिक प्राधिकरणाने वेळोवेळी घातलेल्या अटी, शर्ती व नियमानचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

25) या विषयी दिनांक 09/02/2011 रोजीची जाहिरात व त्या अनुषंगाने करण्यात आलेली प्रक्रिया रद्द करण्यात आली आहे.

26) ही जाहिरात व त्या संबंधाने करण्यात येणारी प्रक्रिया कोणती पूर्व सूचना न देता कोणत्या ही टप्प्यावर रद्द करण्याचे अधिकार राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांनी राखून ठेवले आहेत.

27) या संबधाने उद्‌भवणारी न्यायालयीन प्रकरणे मुंबई न्यायालयीन क्षेत्रात दाखल करावी लागतील.

**सही/-**
**राज्य प्रकल्प संचालक**
**म.प्रा.शि.प.,मुंबई**

# आवश्यक कागदपत्रांची यादी

1. अर्जाचा नमुना - **परिशिष्ट-1**

2. अर्जासोबत जोडावयाची इतर कागदपत्रे

A) अर्जदार संस्थेची वैधानिक आणि आर्थिक स्थिती :

a. अर्जदार संस्थेची कायदेशीर ओळख - नोंदणी प्रमाणपत्र, trust deed आणि उपनियम, इत्यादी.

b. पॅन क्रमांक, टॅन क्रमांक, व्यवसायकर आणि वॅट नोंदणी पुरावा गरजेनुसार.

c. लेखा परिक्षण झालेले वित्तीय विवरणपत्रे वर्ष 2008-09, 2009-10 & 2010-11लेखा परिक्षा अहवालासह (सनदी लेखापालाने प्रमाणित केल्यानुसार).

d. अर्जदार संस्थेस शासनाकडून / वा इतर स्त्रोताकडून निवासी शाळा चालविण्यासाठी निधी मिळाला असल्यास त्याविषयी कागदोपत्री आवश्यक पुरावा.

e. रक्कम रू. 8 लाखाची सुरक्षा ठेव (बोजाविरहीत).

B) यापूर्वीचा संबंधित अनुभव -

i. 100 विद्यार्थी पटसंख्या असलेली त्याच जिल्ह्यातील निवासी शाळा चालविण्याचा अनुभव (विद्यार्थ्यांची मूळ पत्त्यासहीत यादी).

ii. विद्यार्थ्यांचा प्रवर्ग - विरळ लोकसंख्या असलेल्या क्षेत्रातील, अतिदुर्गम व वनक्षेत्रातील, भिक मागणारी, बेघर, अनाथ, पालकांचे संरक्षण नसलेली, विशेष गरजा असलेली मुले. या प्रवर्गातील किमान 30 विद्यार्थी, संस्था चालवित असलेल्या उपरोक्त क्र.1 मध्ये नमूद निवासी शाळेमध्ये असणे अनिवार्य राहील.

iii. शिष्यवृत्ती / राज्य किंवा राष्ट्रीय पातळीवरील इतर शैक्षणिक विषयांच्या परीक्षेला बसून / उत्तीर्ण होऊन मुलांनी संपादणूक पातळी प्राप्त केल्याचा पुरावा सादर करणे आवश्यक राहील.

iv. 35 विद्यार्थ्यांमागे एक शिक्षक याप्रमाणे किमान 4 शिक्षकांचा निकष पूर्ण करीत असल्याबाबतचा पुरावा.

# **आवश्यक कागदपत्रे व प्रक्रिया**

1. **अर्जदार संस्थेने खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर करावीत:**

   a. पाकिट-1 मध्ये खालील कागदपत्रांचा समावेश असावा :

      i. अर्जदार संस्थेच्या प्राधिकृत प्रतिनिधीने विहीत नमुन्यातील स्वाक्षरी केलेले पत्र. **(परिशिष्ट-2)**

      ii. अर्जदार संस्थेच्या विश्वस्त मंडळाने (Board of Trustees) सही करण्यासाठी प्राधिकृत केल्याबाबतच्या ठरावाची प्रमाणित / सत्य प्रत. **(परिशिष्ट-3)**

      iii. अर्जदार संस्थेची कायदेशीर ओळख - नोंदणी प्रमाणपत्र, trust deed आणि उपनियम, इत्यादी.

      iv. लेखा परिक्षण झालेले वित्तीय विवरणपत्रे वर्ष 2008-09, 2009-10 & 2010-11लेखा परिक्षा अहवालासह (सनदी लेखापालाने प्रमाणित केल्यानुसार).

      v. अर्जदार संस्थेच्या नावाने राष्ट्रीयकृत बँकेत रू. 8 लाखाची (बोजाविरहीत) सुरक्षा ठेव असल्याबाबतचे बँक व्यवस्थापकाचे पत्र. **(परिशिष्ट-4)**

      vi. ना-परतावा प्रक्रिया शुल्क म्हणून संबंधित जिल्ह्याच्या **"मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ______" (जिल्हा परिषदेचे नाव)** यांच्या नावाने कोणत्याही राष्ट्रीयकृत / सूचित बँकेमधून काढलेला व त्याच जिल्ह्याकरीता देय असलेला रू. 10,000/- रक्कमेचा धनाकर्ष (Demand draft) जोडावा.

अर्जदार संस्थेने कागदपत्रे सीलबंद पाकिटात बंद करून त्यावर पुढीलप्रमाणे नमूद करावे -

**_______जिल्ह्यात निवासी शाळा सुरू करण्यासाठी अर्ज**

**पाकिट -1**

**पात्रतेसाठी आवश्यक कागदपत्रे**

**सादर करणार ______ (अर्जदार संस्थेचे नाव पूर्ण पत्त्यासह)**

वरील कागदपत्रे पात्रतेसाठी आवश्यक असल्याने मागणीनुसार सादर करावीत. वरील नमूद कागदपत्रे सादर न केल्यास अर्जदार संस्थेस अपात्र ठरवून त्यांचा अर्ज नामंजूर केला जाईल.

b. पाकिट - 2 - गुणानुक्रमासाठी आवश्यक कागदपत्रे

i. पॅन क्रमांक, टॅन क्रमांक, व्यवसायकर आणि वॅट नोंदणी पुरावा गरजेनुसार.

ii. शिष्यवृत्ती / राज्य किंवा राष्ट्रीय पातळीवरील इतर शैक्षणिक विषयांच्या परीक्षेला बसून / उत्तीर्ण होऊन मुलांनी संपादणूक पातळी, तसेच शिष्यवृत्ती प्राप्त केल्याचा पुरावा सादर करणे आवश्यक राहील.

iii. 35 विद्यार्थ्यांमागे एक शिक्षक याप्रमाणे किमान 4 शिक्षकांचा निकष पूर्ण करीत असल्याबाबतचा पुरावा.

iv. शाळेने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, 2009 मधील कलम 19 नुसार शाळेसाठी विहीत केलेली मानके व निकषांची पूर्तता करणे गरजेचे आहे. त्याअनुषंगाने पडताळणीसाठी खालील प्रमाणे विचारण्यात आलेली माहिती उपलब्ध करून द्यावी लागेल :-

| अ. क्र. | बाब | उपलब्धता (होय / नाही) | उत्तर होय असेल तर | | शेरा (बांधकामाचा प्रकार व सद्यस्थिती नमूद करावी) | जमिन व इमारतीबाबत मालकी / भाडेतत्त्वावर / भाडेकरारावर |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | क्रमांक | चौ.मी. मध्ये क्षेत्रफळ | | |
| 1. | जमिन | | | | | |
| | • शाळेचे आवार | | | | | |
| | • पटांगण | | | | | |
| 2. | इमारत | | | | | |
| | • बांधकाम क्षेत्रफळ | | | | | |
| | • वर्गखोल्या | | | | | |
| | • मुख्याध्यापक-नि-कार्यालय-नि-भांडारगृह | | | | | |
| | • मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह मुबलक पाण्याच्या सुविधेसह | | | | | |
| | • मुलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह मुबलक पाण्याच्या सुविधेसह | | | | | |
| | • पिण्याच्या पाण्याची सोय | | | | | |
| | • आवार भिंत | | | | | |
| | • विद्युतीकरण | | | | | |
| | • मध्यान्ह भोजन शिजविण्यासाठी स्वयंपाकगृह | | | | | |
| | • उतार (Ramps) | | | | | |
| 3. | अध्ययन-अध्यापन साहित्य | | | | | |
| 4. | क्रीडा साहित्य | | | | | |
| 5. | ग्रंथालय | | | | | |
| 6. | वाचन / संदर्भ साहित्य | | | | | |

**बांधकामाचे निकष :**

| बाब | निकष |
|---|---|
| वर्गखोली | **प्राथमिक स्तर -**<br>60 पर्यंत विद्यार्थी पटसंख्या - 2 वर्गखोल्या<br>61-90 विद्यार्थी पटसंख्या - 3 वर्गखोल्या<br>91-120 विद्यार्थी पटसंख्या - 4 वर्गखोल्या<br>121-150 विद्यार्थी पटसंख्या - 5 वर्गखोल्या<br>151-200 विद्यार्थी पटसंख्या - 5 वर्गखोल्या + मुख्याध्यापक खोली<br>200 पेक्षा जास्त - 40 मुलांकरीता एक वर्गखोली याप्रमाणे<br>**उच्च प्राथमिक स्तर -**<br>प्रती 35 विद्यार्थ्यांमागे एक शिक्षक व 1 शिक्षकास 1 वर्गखोली या निकषानुसार वर्गखोली बांधकामे प्रस्तावित करावी. |
| स्वच्छतागृह | (1 युनिट म्हणजे 3 मुतारी व 1 शौचालय)<br>शाळेत किमान 2 युनिट (मुलामुलींसाठी स्वतंत्र असावेत)<br>120 पेक्षा अधिक विद्यार्थी असल्यास प्रत्येक 120 विद्यार्थ्यांसाठी 1 अतिरिक्त 1 युनिट असावे. |
| पिण्याच्या पाण्याची सुविधा | सर्व मुलांसाठी स्वच्छ व पुरेसे पिण्याचे पाणी पुरविण्याची सुविधा. |
| विद्युतीकरण | मीटर, फॅन, बल्ब इ. सह सर्व खोल्यांमध्ये वायरींग असावी. |
| आवार भिंत | शाळेच्या इमारतीच्या सुरक्षिततेसाठी आवारभिंत किंवा कुंपण घालून केलेली व्यवस्था असलेली पक्की इमारत |
| मुख्याध्यापक खोली | सर्व शाळांमध्ये आवश्यक |
| क्रीडांगण | उपलब्धतेनुसार |
| रॅम्प | प्रत्येक इमारतीस स्वतंत्र रॅम्प असावा. त्याची उंची 1 फूट असल्यास लांबी 12 फूट या प्रमाणात असावी. (1 x 12) |
| स्वयंपाकगृह | शाळेच्या मुख्य इमारतीपासून किमान 30 फुटांवर असावे. |

**क्र.3 ते 6 साठी उपलब्ध संख्या व त्यांची एकत्रित किंमत नमूद करावी. साहित्य नोंदणीच्या प्रती आवश्यक त्या प्रमाणात सादर कराव्यात.**

# प्रक्रिया

1. वर नमूद केलेली कागदपत्रे संबंधित पाकिटात (पाकिट- 1 व पाकिट-2) सीलबंद करून दोन्ही पाकिटे एका मोठ्या पाकिटात सीलबंद करून शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद यांनी त्यांच्या कार्यालयात ठेवलेल्या पेटीमध्ये टाकावीत. पोस्टाने किंवा अन्य मार्गाने प्राप्त झालेल्या प्रस्तावांचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

2. पाकिट क्र. 1 मधील छाननी केल्यानंतर अर्जदार संस्था जर अपात्र / अर्ज नामंजूर करण्यात आला तर पाकिट क्र. 2 उघडले जाणार नाही व ते अर्जदार संस्थेच्या प्रतिनिधीस परत केले जाईल. पाकिट-1 मधील कागदपत्रांची छाननी केल्यानंतर अर्जदार संस्था जर पात्र ठरत असेल तर मुख्य कार्यकारी अधिकारी संबंधित जिल्हा परिषद यांच्या अध्यक्षतेखाली व अर्जदार प्रतिनिधींच्या उपस्थितीत पाकिट-2 उघडले जाईल.

3. प्राप्त अर्ज व त्याबरोबर जोडलेल्या कागदपत्रांची छाननी करून क्षेत्रीय पाहणीसाठी पात्र संस्थांची लघुसूची-1 (Shortlist-1) तयार करून त्याच दिवशी पुढील सात दिवसांसाठी अधिकृत सूचना कार्यालयीन फलकावर सूचना व हरकती मागविण्याकरीता प्रसिद्ध करण्यात येईल.

4. संबंधित संस्थांनी त्यांच्या अर्जात नमूद केलेल्या ई-मेल पत्त्यावर संबंधित जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) हे प्राप्त झालेल्या सर्व सूचना व हरकती पाठवतील.

5. विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या सूचना व हरकतींवर संबंधित जिल्ह्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडून सुनावणी व निर्णय घेण्यात येईल. त्याप्रमाणे लघुसूचीस अंतिम स्वरूप देण्यात येईल, आणि लघुसूची-1 (Shortlist-1) कार्यालयीन फलकावर प्रसिद्ध करण्यात येईल. तसेच सदरची लघुसूची-1 (Shortlist-1) सर्व संबंधित संस्थांच्या ई-मेल पत्त्यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचेमार्फत पाठविण्यात येईल.

6. लघुसूची-1मध्ये (Shortlist-1) समाविष्ट संस्थांची संबंधित जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद यांच्यामार्फत क्षेत्रीय पाहणी करण्यात येऊन पात्र संस्थांची यादी संबंधित जिल्हा परिषदेच्या अधिकृत सूचना फलकावर सात दिवसांच्या मुदतीकरीता सूचना व हरकती मागविण्याकरीता प्रसिद्ध करण्यात येईल. तसेच संबंधित संस्थांनी त्यांच्या अर्जात नमूद केलेल्या ई-मेल पत्त्यावर संबंधित जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) हे प्राप्त झालेल्या सर्व सूचना व हरकती पाठवतील. विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या सूचना व हरकतींवर संबंधित जिल्ह्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडून सुनावणी व निर्णय घेण्यात येईल.

7. संस्था चालवित असलेल्या सध्याच्या निवासी शाळेतील मागील 3 वर्षांच्या विद्यार्थ्यांच्या प्रवर्ग, पटनोंदणी, टिकवणूक आणि अध्यापनाची गुणवत्ता यावर अर्जदार संस्थांचा गुणानुक्रम ठरविला जाईल व त्यानुसार प्राधान्यक्रम देऊन लघुसूची-2 (Short list-2) तयार करण्यात येईल.

8. लघुसूची-2 (Short list-2) मध्ये निवड झालेल्या व निवड न झालेल्या सर्व संबंधित संस्थांना शिफारस यादी / लघुसूची-2 (Short list-2) ई-मेल पत्त्यावर संबंधित जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) पाठवतील.

9. शिफारस यादी / लघुसूची-2 (Short list-2) संबंधित जिल्ह्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी हे आपल्या स्वाक्षरीनिशी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेकडे पाठवतील.

10. महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावांचे पुनर्विलोकन करण्यात येईल, प्राथमिकता यादीची निश्चिती करून शासनाकडे अंतिम मंजूरीसाठी पाठविण्यात येईल.

11. शासनाची मंजूरी प्राप्त झाल्यानंतर निवडलेल्या संस्थांना निवासी शाळा सुरू करण्याबाबत महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेकडून परवानगी देण्यात येईल.

12. निवड करण्यात आलेल्या ज्या संस्था RTE Act-2009 मधील निकष व मानके व स्वारस्य अभिव्यक्ती (Expression Of Interest) मधील अटी व शर्तीची पूर्तता करतील अशा संस्थांसोबत करार करून केंद्र शासनाच्या निकषानुसार निवासी शाळा अनुदानास पात्र राहील.

13. कराराच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत संबंधित संस्थेला निवासी शाळा सुरू करणे बंधनकारक राहील.

14. निवासी शाळा RTE Act-2009 मधील निकष व मानकानुसार सुरू केल्याबाबतचा अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना सुरू केल्याच्या दिनांकापासून 8 दिवसांच्या आत सादर करावा लागेल. विहीत मुदतीत निवासी शाळा सुरू न केल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता करार आपोआप संपुष्टात येईल.

15. संस्थेला निवासी शाळा चालविण्याची परवानगी दिल्यानंतर बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, 2009 (RTE Act 2009) मधील सर्व तरतूदीचे पालन करणे बंधनकारक राहील.

16. निवासी शाळेच्या अंमलबजावणीबाबतचा दर तीन महिन्यांनी आढावा घेतला जाईल. आढाव्यामध्ये आढळून आलेल्या त्रुटींची पूर्तता पुढील तीन महिन्यात करण्याची एक संधी संबंधित संस्थेस दिली जाईल. तद्नंतरही गंभीर स्वरूपाच्या त्रुटी निर्दशनास आल्यास महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई सदर संस्थेची निवासी शाळा एका वर्षाच्या आत बंद करुन सदर शाळा जिल्हा परिषदेमार्फत चालविण्याबाबतचा अधिकार स्वत: कडे राखून ठेवत आहे.

17. निवासी शाळा व्यवस्थापनाच्या अनुषंगाने संस्थेचे काही आर्थिक दायित्व असल्यास त्याची परतफेड करण्याची तसेच संस्थेच्या विरूद्ध न्यायालयात दावे असल्यास याबाबतची संपूर्ण जबाबदारी संबंधित संस्थेची राहील. हमी स्वरूपात जमा करण्यात आलेली सुरक्षा ठेव रक्कम जप्त करण्यात येईल.

18. केंद्र शासन व राज्य शासनाने घातलेल्या अटी, शर्ती व नियमांचे पालन करणे संस्थेस बंधनकारक राहील.

# परिशिष्ट-१

## अर्जाचा नमुना

| अ. क्र. | तपशिल | तपशिलाबाबत माहिती |
|---|---|---|
| १) | संस्थेचा पूर्ण नाव | |
| २) | संस्थेचा पूर्ण पत्ता | |
| ३) | संस्था संचालकाचे नाव | |
| ४) | फोन नंबर | |
| ५) | E-Mail Address | |
| ६) | संस्था कोणत्या अधिनियमाखाली नोंदणीकृत आहे (नोंदणी क्रंमाक व दिनांक) प्रमाण पत्र व घटनेची प्रत जोडावी. | |
| ७) | संस्थेमध्ये न्यायालयीन प्रकरणे व धर्मादाय आयुक्तांकडे तक्रारी प्रलंबित नसल्याबाबतचे हमी पत्र (सोबत जोडावे) | |
| ८) | संस्थेने मागील किमान तीन वर्ष सनदी लेखापालामार्फत लेखा परिक्षण करुन घेतले आहे काय? असल्याचे त्याचा तपशिल. | |
| ९) | संस्थेचे मागील तीन वर्षाचा 100 किंवा त्या पेक्षा जास्त मुलांसाठी निवासी शाळा चालविण्याचा अनुभव आहे का ? पुरावे जोडावेत. | |
| १०) | निवासी शाळा चालविण्यासाठी संस्थेकडे उपलब्ध असलेला निधी (बँक बॅलन्स पुराव्यासह) | |
| ११) | संस्थेच्या व्यवस्थापनाच्या स्वाधीन असलेला राखीव निधी (रु. 8.00 लाख दिनांक 31 ऑक्टोबर पूर्वी आवश्यक, बँक प्रमाणपत्र जोडावे) | |
| १२) | सदर संस्थेच्या इतर मान्यताप्राप्त प्राथमिक/माध्यमिक/उच्च माध्यमिक इ.शाळा सुरु असल्यास त्याबाबतचा तपशिल (नाव, पत्ता व वर्ग) | |
| १३) | प्रस्तावित ठिकाणी संस्थेची अनाधिकृत निवासी शाळा सुरू असल्यास तेथील वर्गनिहाय विद्यार्थी संख्या शिक्षकांची संख्या त्यांची अर्हता व पूर्वीचा अनुभव (नियुक्त शिक्षक व मुलांची यादी जोडवी) | |

**सध्या निवासी शाळेत शिकत असलेल्या मुलांची यादी :**

| अ. क्र. | विद्यार्थ्याचे नाव | इयत्ता | विद्यार्थ्यांचा निवासाचा कायमचा पत्ता | विद्यार्थी प्रवर्ग* |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**टीप : विद्यार्थी प्रवर्ग या रकान्यात विद्यार्थ्यांचा योग्य तो प्रवर्ग नमूद करावा.**

***विद्यार्थ्यांचा प्रवर्ग -** विरळ लोकसंख्या असलेल्या क्षेत्रातील, अतिदुर्गम व वनक्षेत्रातील, भिक मागणारी, बेघर, अनाथ, पालकांचे संरक्षण नसलेली, विशेष गरजा असलेली मुले.

**सही /-**
**अध्यक्ष / व्यवस्थापक**
**संस्था**

**ठिकाण :**
**दिनांक :**

# <u>(परिशिष्ट-2)</u>

## अर्जदार संस्थेच्या प्राधिकृत प्रतिनिधीने विहीत नमुन्यातील स्वाक्षरी केलेले पत्र

*(अर्जदार संस्थेने विहीत नमुन्यातील अर्ज सादर करताना द्यावयाचे पत्र आपल्या संस्थेच्या लेटरहेडवर द्यावे)*

**प्रति,**
**मा. मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद,**
**जिल्हा _______ (नंदुरबार, पुणे, कोल्हापूर)**

**विषय : <u>निवासी शाळा सुरू करण्याबाबतचा प्रस्ताव</u>.**

**संदर्भ : दिनांक ______ रोजी _____ वृत्तपत्रात प्रकाशित झालेली जाहिरात.**

**महोदय,**

निवासी शाळा सुरू करण्याबाबत संस्थांकडून उपरोक्त संदर्भीय जाहिरातीद्वारा प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. त्याअनुषंगाने आमच्या संस्थेचा विहीत नमुन्यातील प्रस्ताव आपणाकडून विचारणा करण्यात आलेल्या आवश्यक कागदपत्रासह (पाकिट-1 व पाकिट-2 यांचा समाविष्ट असलेले मुख्य पाकिट) यासोबत जोडून सादर करण्यात येत आहे.

संस्था खालीलप्रमाणे लिहून देते की,

1. निवासी शाळा सुरू करण्याचा प्रस्ताव आमच्या नोंदणीकृत संस्थेद्वारा सादर करण्यात येत आहे. यामध्ये न्यासाने विहीत केलेल्या सदस्यांचा समावेश आहे.
2. आम्ही जाहिरात व संकेतस्थळावरून प्राप्त झालेल्या अर्ज व इतर दस्ताऐवजांची पाहणी केली असून त्यामधील अटी व शर्ती आमच्या संस्थेस मंजूर आहेत. त्यामध्ये विचारण्यात आलेल्या आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची पूर्तता करण्यास संस्था बांधिल आहे.
3. अर्जात विचारण्यात आलेली माहिती पूर्ण असून ती बरोबर असल्याची खातरजमा केलेली आहे. त्यामधील माहितीत तफावत / दोष आढळून आल्यास त्यास संस्था सर्वस्वी जबाबदार राहील. त्यामुळे निवासी शाळेचा प्रस्ताव निकाली निघाल्यास त्याबद्दल संस्थेची कोणतीही तक्रार राहणार नाही.

4. जाहिरातीत व प्रक्रियेत विचारण्यात आलेल्या न्यायालयीन बाबींची पूर्तता केली असून निवडीचे निकष संस्था पूर्ण करीत आहे.

**(संस्थेचा शिक्का)**

**सही**

(परिशिष्ट-3)

# अर्जदार संस्थेच्या विश्वस्त मंडळाने (Board of Trustees) सही करण्यासाठी प्राधिकृत केल्याबाबतच्या ठरावाची प्रमाणित / सत्य प्रत

**प्रति,**
**मा. मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद,**
**जिल्हा _______ (नंदुरबार, पुणे, कोल्हापूर)**

**महोदय,**

निवासी शाळा सुरू करण्याबाबत आमच्या संस्थेकडून आवश्यक पत्रव्यवहार, कागदपत्रे सादर करण्यासाठी संस्थेचे प्रतिनिधी श्री / श्रीमती ______________________________यांना संस्थेचे विश्वस्त मंडळ नामनिर्देशित करीत आहे. निवासी शाळा संबंधीचा यापुढील पत्रव्यवहार नामनिर्देशित करण्यात आलेले प्रतिनिधी पाहतील. त्यांचा सविस्तर तपशील खालीलप्रमाणे -

प्रतिनिधीचे नाव : ______________________________________हुद्दा :_________________

संपर्काचा पत्ता : ______________________________________________________________

________________________________________________________________________

दूरध्वनी क्रमांक : ________________________फॅक्स क्रमांक : _______________________

भ्रमणध्वनी क्रमांक : _______________________ई-मेल पत्ता ________________________

**संस्थेचा शिक्का :**

**विश्वस्त मंडळाच्या प्रतिनिधींची स्वाक्षरी :**

| क्र. | नाव | हुद्दा | स्वाक्षरी |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

**(परिशिष्ट-4)**

# अर्जदार संस्थेच्या नावाने राष्ट्रीयकृत बँकेत रू. 8 लाखाची (बोजाविरहीत) सुरक्षा ठेव असल्याबाबतचे बँक व्यवस्थापकाचे पत्र

*(स्टॅम्प पेपरवर राष्ट्रीयकृत / सूचित बँकेत सुरक्षा ठेवीबाबत प्रतिज्ञापत्र करण्याचा नमुना )*

WHEREAS, ______________________________(name of the Institution) wishes to submit his Request for Proposal for the Selection of Opening Residential School in ___________ district of Maharashtra, hereinafter called "the Institution". KNOW ALL MEN by these presents that we ________________________ (name of bank) of ___________________ ________________________ (State) having our registered office at _______________________________________________________ (hereinafter called "the bank") are bound to the Chief Executive Officer, Zilla Parishad, _________ or its successor, (hereinafter referred to as "CEO, ZP,_______") in the sum of Rs. 8,00,000/- (Rupees Eight Lakhs only) which payment can truly be made to CEO, ZP, __________. The Bank binds themselves, their successors and assigns by these presents.

Sealed with the Common Seal of the Bank this _______________day of ___________ 2011.

THE CONDITIONS of this obligation for invoking the guarantee by CEO, ZP, ________are:

(a) If the Institution withdraws his application at any time during the stipulated period of Bid Validity of _______ months from the last date for submission of application as specified in the Request for Proposal Document (or such period of validity as may be extended).

(b) If the Institution, for the period of the Bid Validity (of 6 months):

- i) In CEO, ZP, __________ opinion, commits a material breach of any of the terms and / or conditions contained in the Proposal Document and / or subsequent communication from CEO, ZP, __________ in this regard and / or
- ii) Fails or refuses to accept the Letter of Award (in the event of the Award of the Programme to it) and/or

iii) Fails or refuses to furnish the Performance Guarantee within the stipulated time (viz. 30 days from the issue of the Letter of Award awarding the Programme to it).

The Guarantee will remain in force up to and including the date of expiry of the period of Bid Validity as stated in the Proposal Document or as extended by CEO, ZP, __________ at any time, notice of which extension to the Bank being hereby waived.

Provided however, that

- In the event that Institution is selected for award of the Programme through the issue of the Letter of Award, the Bid Security shall remain in force until the creation of the Performance Guarantee by such Institution.

OR

- In the event this Institution is not selected for award of the Programme, the Bid Security shall remain in force up to and including a period of 30 days after the announcement of award of the Programme to the Successful Bidder and the issue of the Letter of Award awarding the same. (Provided, however, that in the event that the Institution is Non Responsive, then the Bid Security of such Institution can cease to be in force upon return of the unopened Cover-2 of his Bid).

Notwithstanding anything contained herein above:

1. Our liability under this guarantee shall not exceed Rs. 8,00,000/-(Rupees Eight Lakhs only)
2. This guarantee is valid from ________ to __________
3. We are liable to pay guaranteed amount or part thereof only if you serve upon us a written claim or demand on or before _________

Any demand in respect this Guarantee should reach the Bank not later than the date of expiry (as defined above) of this Guarantee.

**SIGNATURE OF AUTHORISED : ________________________________**

**REPRESENTATIVE OF THE BANK : ________________________________**

**NAME AND DESIGNATION : ________________________________**

**SEAL OF THE BANK : ________________________________**

**TELE NO./ FAX NO./ EMAIL : ________________________________**

**SIGNATURE OF THE WITNESS : ________________________________**

**NAME OF THE WITNESS : ________________________________**

**ADDRESS OF THE WITNESS : ________________________________**

# प्रक्रियेचे टप्पे व कालावधी

| अ.क्र. | प्रक्रियेचे टप्पे | निर्धारित कालावधी |
|---|---|---|
| 1. | निवासी शाळा सुरू करण्यासाठी स्वारस्य अभिव्यक्ती (Expression of Interest) मागविण्यासाठी वृत्तपत्रात जाहिरात प्रकाशित करणे | **28/12/2011** |
| 2. | प्रस्ताव सादर करण्यास इच्छुक असणाऱ्या संस्थांना नमुना अर्जाची प्रत www.mpsp.org.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देणे | **28/12/2011 ते 24/01/2012** |
| 3. | प्रस्तावाबाबत त्रुटी लेखी स्वरूपात mpspmah@gmail.com नोंदविण्याची तारीख | **03/01/2012 सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत** |
| 4. | महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद कार्यालय, चर्नीरोड येथे निविदापूर्व बैठक (Pre-Bid meeting) | **04/01/2012 दुपारी 3.00 वाजता** |
| 5. | वेबसाईटवर दुरूस्त्या www.mpsp.org.in संकेतस्थळावर उपलब्ध करून देणे | **05/01/2012 दुपारी 3.00 वाजेपर्यंत** |
| 6. | परिपूर्ण प्रस्ताव स्विकृत करण्याची अंतिम तारीख व वेळ (पाकिट-1 व पाकिट-2 च्या समावेशासह) संबंधित जिल्हा कार्यालयात | **27/01/2012 दुपारी 3.00 वाजेपर्यंत** |
| 7. | निविदा उघडण्याची तारीख व वेळ (पाकिट-1) संबंधित जिल्हा कार्यालयात | **27/01/2012 सायंकाळी 4.00 वाजता** |